याहा मोगी माता - श्रद्धेचा दीपस्तंभ

(आप राहुल वंदना कांतिलाल गावित)

याहा मोगी माता - श्रद्धेचा दीपस्तंभ

लेखक

आप राहुल वंदना कांतिलाल गावित

वर्ष - २०२५

आदिवासी संस्कृती, श्रद्धा आणि एकतेचा महोत्सव

कणसरा प्रकाशन

आदिवासी प्रतिज्ञा

मी एक आदिवासी आहे. माझ्या समाजाचा इतिहास, संस्कृती, परंपरा आणि भाषा यांचा मला अभिमान आहे.
माझ्या पूर्वजांनी जपलेल्या निसर्गाच्या आणि मानवतेच्या मूल्यांचा मी आदर करतो.मी माझ्या आदिवासी जमातीच्या हक्कांसाठी नेहमी जागरूक राहीन. शिक्षण, स्वावलंबन आणि एकता यांचा अवलंब करून मी माझ्या समाजाचा आणि देशाचा विकास साधण्यासाठी कटिबद्ध राहीन. भेदभाव, अन्याय आणि शोषणाविरुद्ध मी आवाज उठवीन. माझ्या आदिवासी अस्मितेचे जतन करण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीन.

लेखकाचे ऋणनिर्देश

या पुस्तकाच्या लेखनप्रक्रियेमध्ये अनेकांचे सहकार्य लाभले आहे. "याहा मोगी माता" या आदिवासी जनतेच्या श्रद्धास्थानावर आधारित हे पुस्तक फक्त माझ्या प्रयत्नांमुळे सिद्ध झाले नसून, हा एक सामूहिक सांस्कृतिक प्रयास आहे.

सर्वप्रथम, मी याहा मोगी मातेच्या कृपेला नम्र वंदन करतो, जिने मला हे लेखन करण्याची ऊर्जा, दिशा आणि श्रद्धा दिली.

आप किसन ठाकरे सर (केंद्रीय सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान) यांचे विशेष आभार, कारण त्यांनी "याहामोगी माता" या विषयाचे मूळ आदिवासी दर्शन आणि इतिहास मला समजावून दिला. त्यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनामुळेच या पुस्तकात आशयाला एक सुसंगत आणि मूळ स्वरूप मिळाले.

माजी महापौर रंजनाताई भानसी (मनपा नाशिक), अरुणजी पवार माजी गटनेता तथा नगरसेवक, महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान टीम, समस्त आदिवासी समाज बांधव तसेच पूजारा दत्तू साबळे, राहुल गावित व गणेश आहेर, अतुल भानसी, मोतीलाल चव्हाण, युवराज महाले, मनोज पवार, किरण महाले, मनोज झिरवाळ यांच्या अथक प्रयत्नामुळे याहा मोगी मातेचे ठाण उभे राहिले. त्यांच्या कार्यामुळेच या पुस्तकाची प्रेरणा निर्माण झाली.

पाच मुलींच्या छोट्या उत्सवापासून ठाण निर्मितीच्या प्रवासापर्यंत अनेक घटना, अनुभव आणि भावना त्यांनी माझ्याशी शेअर केल्या, त्यामुळे लेखनात जिवंतपणा आला.

संपूर्ण आदिवासी समाजाचे, विशेषतः बोरगड परिसरातील लोकांचे मनःपूर्वक आभार, ज्यांनी ही परंपरा जपली, आणि याहा मोगी मातेची श्रद्धा आजही जागवली आहे.

माझ्या कुटुंबियांचे, ज्यांनी लेखन काळात मला वेळ, समज आणि आधार दिला.

शेवटी, या पुस्तकाच्या वाचकांचेही मी आभार मानतो – कारण आपल्या श्रद्धेने, विश्वासाने आणि संस्कृतीवरील प्रेमानेच ही शब्दयात्रा पूर्णत्वाला जाते.

- लेखक

आप राहुल वंदना कांतीलाल गावित
(आदिवासी संस्कृती संवर्धक)
महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान

अनुक्रमणिका

प्रस्तावाना
लेखकाचे ऋणनिर्देश
१) याहामोगी माता ठाणाची निर्मिती - आदिवासी बचाव अभियनाची विजयी कहाणी
२) ठाणाची प्रेरणादायी सुरुवात
३) श्रद्धेचा अविस्मरणीय प्रवास
४) आदिवासी संस्कृतीचे शिल्पकार - पुजारा/भगत आप दत्तू साबळे
५) याहा मोगी माता विषय बोलतांना - आप किसन मोंढाजी ठाकरे यांचा दृष्टिकोन
६) आदिवासी संस्कृती संवर्धक – गणेश आहेर व मोतीलाल चव्हाण
७) दृढ संकल्पातून साकारलेले स्वप्न
८) याहामोगी मातेची जागा निश्चिती
९) पूजन सोहळा
१०) सभामंडपाच्या विकासाची माननीय नामदार राहुल भाऊ ढिकले यांचे योगदान
११) सामाजिक योगदान व पुढील वाटचाल
१२) परिशिष्ट
१३) माध्यम प्रसिद्धी
१४) समारोप
१५) लेखक परिचय

प्रस्तावना

"याहा मोगी माता - श्रद्धेचा दीपस्तंभ"

आदिवासी संस्कृती ही निसर्गपूजेवर आधारित आहे. आपल्या पूर्वजांनी ज्या शक्तीस्थानांना वंदन केले, त्यातीलच एक जागृत आणि श्रद्धेचं प्रतीक म्हणजे याहामोगी माता. या पुस्तकाच्या माध्यमातून भूमिपूजनापासून प्रतिकेचे स्थापनेपर्यंतचा संपूर्ण प्रवास मांडायचा आहे - जो फक्त एक धार्मिक कार्यक्रम नव्हता, तर समाजाच्या एकतेचा, आत्मिक उन्नतीचा आणि संस्कृतीच्या जतनाचा एक ऐतिहासिक क्षण होता. यात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे योगदान अमूल्य आहे. त्यामुळे या पुस्तकात आठवणी, अनुभव, कविता, चित्रफीत व प्रेरणादायक किस्से यांचा समावेश करण्यात आलेला आहे. हे पुस्तक म्हणजे आपल्या मातृदेवतेला अर्पण केलेला एक ललित पुष्पगुच्छ आहे.

"शब्दांच्या ओवाळणीत..."

शब्दांच्या ओवाळणीत मातेच रूप फुलवितो,
याहामोगी मातेच्या चरणी आज हे लेखन अर्पितो.
भूमिपूजनाची माती जशी हातात गंध पसरवते,
तशीच श्रद्धेची गाथा, या पानांमध्ये साठवतो।

याहामोगी मातेची ओळख

देवमोगरा ता.सागबार जिल्हा नर्मदा(गुजरात) या ठिकाणी याहामोगी मातेचे आदिवासींचे श्रध्दा स्थान आहे. हजारो वर्षा पासून येथे आदिवासींचे राज्य होते याला 'हेलोदाब' असे म्हणत, याचे पाटी नुसार चार भाग होते, नोयरापाटी, निंबाडीपाटी, आंबुडापाटी, आणि दुबळापाटी असे चार दिशेचे चार प्रांत होते,या प्रांताची जबाबदारी नाहल,निंबाडी,आंबुडा (वसावा) आणि दुबळा मावची या जमातीकडे होता. त्या प्रत्येकाचा एक-एक मुखीया होता. राजा तारणमहाल याचा मुलगा राजापांठा अतिशय बलवान ,शूर व दानशूर होता.याला नऊ राण्या होत्या त्याची दुसरी पत्नी ही राजा गांठा ठाकोर याची बहीण यहामोगी होय. ती अतिशय सुंदर होती राजा बाहा गोऱ्या ची ती चौथी मुलगी दिसायला सुंदर असल्याने तिचे लग्न मोठया बहिणींच्या अगोदर झाले त्या मुळे बहिणींमध्ये सतत भांडण होत तीला कोसले जायचे, त्या मुळे ती घर सोडून गेली. दरम्यानच्या काळात मोठा दुसकाळ पडला होता अन्न पाण्याविना लोकांची उपासमार झाली सततच्या दुसकाळा मुळे जंगलात कंदमुळेही मिळत नव्हते, याहामोगीलाही अन्न न मिळाल्याने ती एका झाडाखाली मरणासन्न अवस्थेत पडली होती याच समयास राजा बाहागोऱ्या ला ती दिसली, त्याने तीला आपल्या घरी आणले. तिला आपुलकीने अनाथ मुलगी म्हणून घरी ठेवले. आश्रय मिळाल्याने व अनाथ असल्याने तीला पोहली पांढरी (पालिता) यहापांढरी असे नवे नावाने संबोधले जाऊ लागले.

पूढे यहामोगी कुटुंबातील कलहा मुळे देवमोगरा येथे एकटीच राहण्यासाठी आली. येथे छोट्याशा कुटीत ती एकटीच राहू लागली,

याच काळात पुन्हा एकदा भीषण दुष्काळ पडला प्रचंड पशुबळी, अन्न पाण्याविना मनुष्य हानी झाली, अनेकांनी स्थलांतर केले. *दाब* राज्य उजाड झाले. यहामोगी ने धीर सोडला नाही तीने आपल्या भागातील लोकांना वाचविण्यासाठी गवळी राजा कडे धाव घेतली राजापांठा,विना ठाकोर, वाघमल, धामनमल याची मदत घेतली, स्थानिकांना अन्न व पशूधन मिळवून दिले. तिच्या या उदात्तीकरणा मुळे व जनसेवे मुळे, तीला *याहा* म्हणजे *आई* (लोकमाता) अन्न देणारी देवता असे संबोधले जाऊ लागले. कालांतराने यहामोगी चा मृत्यू झाला पुढे तिच्या महान कार्यामुळे राजापांठा व विनाठाकोर यांनी तीची सोन्याची मूर्ती बनवून मातीचे घर बनवून त्यात स्थापना करून ठेवली. पुढील काळात अनेक आक्रमणे झाली त्यातून मूर्ती वाचविण्यासाठी त्यांच्या राजाच्या वंशजांनी यहामोगी ची मूर्ती मातीत बुजून ठेवली.

अनेक वर्षांनी सागबाऱ्या तील चंपाजी वसावा याला घनदाट जंगलात ही मूर्ती सापडली त्याने याहामोगी महत्व जाणून महाशिवरात्रीला देवमोगरा या ठिकाणी मातीची कुटी बनवून मूर्तीची स्थापना केली.

याहामोगी च्या अनेक कथा आहेत. राजगींब,पोहला पोमरा, राजा आगीवाल,राणी देवरूपन,काला बेड्या, खोड्या देव अश्या अनेक मौखिक लोककथा याहामोगीच्या महान कार्यावरून सांगितल्या जातात.

घरजावई (सेवाविवाह) प्रथा ,गव्हाण पूजन (गोठा) परंपरा यावरूनच सुरू झाल्या आहेत. याच बरोबर ,पशूंची भाषा जाणणारा - राजा सिंड गोवा, अति अन्न खाऊन पचविणारा -दोधा वजीर, *स्त्री* च्या वेशात समाज कार्य करणारा - विना ठाकोर, दुष्काळात अन्न

वाटणारा- बाहा गोऱ्या,पत्नी प्राप्तीसाठी अन्न त्यागणारा- राजा गिंब. यांच्याही कथांमध्ये
याहामोगीचे वर्णन आहे. यहामोगी एक महान परोपकारी *स्त्री* होऊन गेली आहे तीचे समाजाप्रती असलेल्या योगदाना मूळे तीला देवत्व मीळाले आहे.

याहामोगी माता ही आदिवासी समाजाच्या श्रद्धेचे रूप आहे. अनेक पिढ्यांपासून आदिवासी समाज निसर्गपूजा करत आला असून, त्यात याहा मोगी मातेचे स्थान अत्यंत विशेष आहे. समाजात बळ निर्माण करणारी, अंधश्रद्धेवर प्रहार करणारी आणि एकत्र बांधून ठेवणारी ही माता आता बोरगड - म्हसरूळ या ठिकाणी स्थापन झाली असून हे फक्त ठाण उभारणं नाही, तर आपल्या संस्कृतीचा पुन्हा अभिमानाने उलगडा होणं आहे.

१. याहा मोगी माता ठाणाची निर्मिती – आदिवासी बचाव अभियानाची विजयी कहाणी

कणसरा माता चौक परिसरात सुरू झालेला याहा कणसरा महोउत्सव म्हणजे केवळ एक धार्मिक कार्यक्रम नव्हता, तर तो आदिवासी अस्मिता, संस्कृती आणि हक्कांच्या लढ्याचं प्रतीक ठरला. या प्रेरणादायी उपक्रमामागे एक प्रबळ हातभार होता - तो म्हणजे "महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान".

अभियानाने बोरगड- म्हसरूळ परिसरातील आदिवासी समाजात श्रद्धेचं बळ, संघटनेचं महत्त्व आणि सांस्कृतिक आत्मभान जागवलं. वर्षानुवर्षे त्यांनी संयम, संघर्ष आणि सातत्याने कणसरा उत्सवाचं आयोजन केलं आणि या उत्सवातून हजारो लोकांना एकत्र आणलं.

या लोकचळवळीची प्रखर दखल घेत माननीय माजी महापौर तथा नगरसेविका रंजनाताई भानसी यांनी स्वतः पुढाकार घेतला आणि ठाणात "याहा मोगी माताची" स्थापना घडवून आणली. त्यांच्या प्रयत्नांना गती मिळाली ती आदिवासी बचाव अभियानाच्या आधीपासूनच्या चळवळीमुळेच. आज हे स्थान फक्त एक ठाण नसून, जनआंदोलनातून साकारलेलं श्रद्धास्थळ, सामाजिक एकोपा आणि आदिवासी स्वाभिमानाचं प्रतीक बनलं आहे. ही ठाणाची निर्मिती म्हणजे जनतेच्या विश्वासाचा विजय, आणि आदिवासी बचाव अभियानाच्या अथक कार्याचा मानाचा मुकुट आहे.

२. ठाणाची प्रेरणादायी सुरुवात

याहा मोगी माता ठाणाची स्थापना ही एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. आदिवासी बचाव अभियान व कणसरा माता चौक मित्र मंडळ यांनी २०१५ पासून सुरु केलेले याहा कणसरा महोत्सव कणसरा माता चौक येथे चालू होतच त्यातच त्या ठिकाणी महोत्सवासाठी जागा कमी पडत होती म्हणून पुजारा दत्तू साबळे यांच्या घराजवळ वरद नगर पाण्याच्या टाकी जवळ एक मनपाची मोकळी जागा होती, तेथे २०२३ पासून देव कणसरा मंडळाच्या नावाने त्या जागी उत्सव सुरु करण्यात आले, पाच चिमुकल्या मुली देवयानी जगताप, चंचल जगताप, वैष्णवी वाघ, सृष्टी जाधव, निकिता वाघ यांनी खरं तर त्या ठिकाणी उत्सव सुरु करायला लावल होत त्याची दखल घेत आप दत्तू साबळे,आप राहुल गावित, गणेश आहेर, मोतीलाल चव्हाण, युवराज महाले, पांडुरंग गायकवाड यांनी छोटेखानी याहामोगी माता उत्सवाला

सुरुवात केली होती. यांनी कोणताही दिखावा न करता, निसर्गाशी नाते ठेवत, पारंपरिक श्रद्धेनुसार पूजन, गाणं, आणि उत्सव पार पाडला.

त्या साध्या उत्सवाने लोकांच्या मनात विचार रुजवला –

" स्थायी स्वरूपात याहा मोगी माताचे ठाण उभे राहायला हवे."

म्हणून -- आदिवासी बचाव अभियानाची टीम कणसरा माता चौकात याहा कणसरा मातेच महोत्सव साजरा करत होते, तेव्हापासूनाची मागणी होती, की याहा मोगी मातेच ठाण व्हावे..

वर्ष २०२३ मध्ये देव कणसरा मंडळ, बोरगड येथे नवरात्री मध्ये कणसरा मातेच उत्सव सुरु असतांना माजी महापौर रंजनाताई भानसी यांनी त्या ठिकाणी जाऊन मातेला नमन केले व दर्शन घेतले त्या नंतर पुजारा दत्तू साबळे, राहुल गावित व गणेश आहेर, मोतीलाल चव्हाण यांनी ताईला सांगितले की, या ठिकाणी छोटं का होईना एक याहा मोगी मातेच ठाण बांधून द्या तेंव्हा ताई म्हणाल्या की ठिक आहे, या ठिकाणी मी तुम्हाला ठाण आणि सभामंडप सुद्धा मंजूर करून बांधून देईल. त्या नंतर काही कालावधीतच भूमी पूजनाचा दिवस उगवला तो म्हणजे ११ फेब्रुवारी २०२४ रोजी ठाण बांधण्यासाठी भूमीपूजनाला सुरुवात झाली, भूमी पूजनाला रंजनाताई भानसी, पोपटराव भानसी, आप किसन ठाकरे, जयवंत गारे, पंडित बहिरम, नामदेव बागुल, दत्तू साबळे,राहुल गावित, दुर्वादास गायकवाड, मनोज पवार, किरण महाले, मनोज झिरवाळ, गणेश आहेर, पांडुरंग गायकवाड, युवराज महाले, मोतीलाल चव्हाण आदि व वरद नगर येथील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तद्दनंतर थोडयाच दिवसात ताईने सभामंडप सुद्धा मंजूर करून आणलं व ते बांधायला सुरुवात झाली. वर्ष २०२५ एप्रिल पर्यंत

ठाणाचे व सभामंडपाचे काम पूर्ण होत होत, त्याच बरोबर याहा मोगी मातेच प्रतिक व कलशाच काम पूर्ण झालं, कलशाची रचना आदिवासी पद्धतीने आप भारत पवार (कलाशिक्षक, देवळा) यांच्याकडून एका कागदावर नक्षी काढून कलश सोनगीर येथून कारागीर कढून तयार करून घेतला, कलश आणण्यासाठी आप दत्तू साबळे, आप राहुल गावित, आप गणेश आहेर, आप मोतीलाल चव्हाण व आप मनोज महाले यांनी कलश नाशिक येथे आणला..

याहा मोगी मातेच प्रतीकाच रूप शिल्पकार राजेंद्र कवर यांनी तयार करून दिला व आप गणेश गांगुर्डे, भावराव पाडवी यांनी पंचधातूत साडे तीन फुटामध्ये याहा मोगी मातेच प्रतिक तयार केलं. प्रतिक तयार झाल्यानंतर पावरीच्या मधुर सुरात दत्तू साबळे यांच्या घरी आणलं... मार्च २०२५ मध्ये मातेचे चरण ,पाच धान्य, महुचा रस एका टोपलीत बांधून घेतले व टोपली भेटविण्यासाठी (मोठादेव, गुजरात) , कणसरा गड, देवमोगरा माता येथे आप दत्तू साबळे भानसी ताई, राहुल गावित, गणेश आहेर, मोतीलाल चव्हाण, मनोज झिरवाळ, मनोज पवार, किरण महाले, अतुल भानसी आदि सगळे बांधव तेथे जाऊन त्या ठिकाणाचे जल व मृदा नाशिक येथे याहा मोगी माता ठाणा जवळ आणले व ज्या ठिकाणी याहा मोगी मातेच प्रतीक स्थापन करायच होत तेथे पाच बांधवानाच्या हातून जल व मृदाचे पूजन करून पुढील कार्य सुरु केले. हीच सुरुवात झाली एकतेच्या प्रवासाची. स्थानिक ग्रामस्थ, आदिवासी बचाव अभियान, व इतर पुढाकार घेणाऱ्यांच्या मदतीने अखेर त्या जागेवर याहा मोगी माता ठाण उभे राहिले – श्रद्धेचा व संस्कृतीचा दीपस्तंभ बनून.

३. श्रद्धेचा अविस्मरणीय प्रवास

बोरगड परिसरातील आदिवासी समाजासाठी श्रद्धेचे व एकतेचे प्रतीक ठरलेली याहा मोगी माता हे ठिकाण आज एक पवित्र स्थळ म्हणून ओळखले जाते. या स्थळाच्या निर्मितीमागे अनेकांचे परिश्रम आहेत, मात्र विशेषतः माननीय माजी महापौर तथा नागसेविका सौ. रंजनताई भानसी व अरुणजी पवार माजी गटनेता तथा नगरसेवक, नाशिक यांच्या अथक प्रयत्नांमुळे हे ठिकाण वास्तवात आले, हे उल्लेखनीय आहे. रंजनताई भानसी यांनी आपल्या कार्यकाळात केवळ प्रशासकीय दृष्टीनेच नव्हे तर सामाजिक भान ठेवून आदिवासी संस्कृतीच्या जपणुकीसाठी विविध उपक्रम राबवले. याहा मोगी माता ठाणाची निर्मिती हे त्यांचे एक दूरदृष्टीपूर्ण पाऊल ठरले. स्थानिक ग्रामस्थांशी संवाद साधत, त्यांच्या श्रद्धेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी विविध यंत्रणांशी समन्वय साधून भूखंडाचे संरक्षण, विकास आराखडा, सुविधा उपलब्ध करून देणे व ठाण परिसराची निर्मिती ही कार्ये प्रभावीपणे पार पाडली. आज याहा मोगी माता ठाण हे फक्त धार्मिक ठिकाण नाही, तर सामाजिक एकात्मतेचे, स्त्रीशक्तीच्या नेतृत्वाचे आणि संस्कृतीच्या जतनाचे प्रतीक ठरले आहे. दरवर्षी येथे उत्सव, आदिवासी पूजन आयोजन होत असून हजारो बांधव येथे उपस्थित राहतात. रंजनाताईंच्या पुढाकारामुळे या ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या असून परिसराचा सर्वांगीण विकास होत आहे. त्यांच्या या योगदानामुळे आदिवासी समाजात त्यांच्या कार्याची कायम आठवण ठेवली जाईल, आणि याहा मोगी माता ठाण त्यांच्या सामाजिक समर्पणाची साक्ष म्हणून उभे राहील.

४. आदिवासी संस्कृतीचे शिल्पकार : पुजारा/भगत दत्तू साबळे

माणूस मोठा पदाने होत नाही, तर तो मोठा होतो आपल्या विचारांनी, संस्कारांनी आणि समाजासाठी केलेल्या योगदानाने. आदिवासी समाजामध्ये आपल्या परंपरा, विधी आणि श्रद्धांचा ठेवा आजही तितक्याच निष्ठेने जपला जातो. हे कार्य पार पाडणाऱ्या व्यक्तींपैकी एक महत्वाचे नाव म्हणजे पुजारी दत्तू साबळे.

परंपरेचा निष्ठावान संरक्षक

दत्तू साबळे हे केवळ एक पुजारी नाहीत, तर ते आदिवासी संस्कृतीचे जीवंत प्रतीक आहेत. आधुनिकतेच्या लाटेत परंपरेचा विसर पडू नये म्हणून त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य आदिवासी विधी, संस्कृती आणि श्रद्धा यांचं जतन करण्यासाठी समर्पित केलं आहे.

ते आजपर्यंत हजारो आदिवासी रीतिरिवाजानुसार विवाह आणि घरभरणीचे विधी पार पाडले आहेत, आणि हे सर्व विधी त्यांनी पारंपरिक पद्धतीने, ढोल, पावरी, तारपा, ढाक, फुलं, नागली, धान्य, वनदेवता व आदिवासी कुलदैवत यांच्या साक्षीने अत्यंत निष्ठेने पार पाडले आहेत.

संस्कृती संवर्धनाची धडपड

त्यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी विवाह, भुमीपूजन, देवक स्थापना, घरभरणी, जंगलदेव, असे अनेक धार्मिक विधी पारंपरिक पद्धतीने पार पाडले आहेत. ते प्रत्येक विधीमध्ये निसर्ग देवता आणि माणसांमधील नातं दृढ करत परंपरेला नवसंजीवनी देतात.

याहा मोगी माता ठाणाचे संस्थापक पुजारी

२०२५ मध्ये याहा मोगी माता ठाण या सांस्कृतिक स्थळाची स्थापना करण्यात आली. या ठिकाणी याहा मोगी मातेची प्रतीकाची स्थापना करून दत्तू साबळे व राहुल गावित यांनी विधीवत पुजन करून मातेची स्थापना केली. हे ठिकाण आज अनेक आदिवासी बांधवांचे श्रद्धास्थान बनले आहे.

तरुण पिढीसाठी आदर्श

फक्त विधी करणे हेच त्यांचं कार्य नसून, नव्या पिढीला संस्कृतीचा वारसा समजावून देणे हाही त्यांचा प्रमुख हेतू आहे. त्यांनी अनेक तरुणांना पारंपरिक पुजारी म्हणून घडवले, त्यांना आदिवासी विधी शिकवले आणि संस्कारांची उब दिली.

निष्कर्ष

पुजारी दत्तू साबळे हे आदिवासी समाजासाठी एक संवेदनशील, निष्ठावान आणि संस्कृतीप्रेमी नेतृत्व आहेत. त्यांनी हजारो विधींमधून केवळ परंपरा जपल्या नाहीत, तर त्या नव्या उत्साहाने पुढे नेल्या. आजच्या काळात अशी माणसं समाजाला ओळख, आत्मभान आणि एकता देतात.

५. याहा मोगी माता विषयी बोलताना – किसन मोंढाजी ठाकरे यांचा दृष्टिकोन

याहा मोगी माता ही आदिवासी समाजासाठी केवळ एक श्रद्धास्थान नाही, तर ती त्यांच्या अस्तित्वाची, संस्कृतीची आणि अस्मितेची जिवंत साक्ष आहे. आदिवासी जीवनशैली, परंपरा आणि सामाजिक मूल्यांना ज्यांनी आयुष्यभर वाहून घेतलं, असे व्यक्तिमत्त्व म्हणजे किसन मोंढाजी ठाकरे.

मूलगामी विचारवंत व जनतेचे सेवक -

किसन ठाकरे हे नाव म्हणजे संघर्ष, आत्मभान आणि सामाजिक जागृती यांचं प्रतीक. त्यांनी आपल्या विचारांनी आणि कृतीने अनेक पिढ्यांना आदिवासी संस्कृतीच्या मूळाशी परत नेलं. त्यांच्यासाठी याहा मोगी माता ही केवळ धार्मिक देवता नव्हती - ती त्यांच्या आंदोलनाची प्रेरणा, जाणीवांचा केंद्रबिंदू आणि सामाजिक न्यायाची अधिष्ठात्री शक्ती आहे.

याहा मोगी माता – अस्मितेची प्रतीक -

किसन ठाकरे अनेकदा म्हणतात

"आपल्या मातेचं स्मरण म्हणजे आपल्या मातीशी नातं टिकवणं. याहा मोगी मातेचा जागर म्हणजे विस्मरणाच्या अंधारात आपली ओळख पुन्हा प्रकाशात आणणं."

त्यांच्या मते, याहा मोगी माता आदिवासींची संरक्षणकर्ती आहे, जी आपल्याला एकत्र बांधून ठेवते. ज्या ठिकाणी ही माता वास करते, तिथे संघर्ष, एकजूट आणि श्रद्धेची ऊर्जा सळसळते.

संघर्षमय यात्रा आणि समर्पण -

किसन ठाकरे यांनी गावोगाव सभा घेतल्या, युवा वर्गात प्रबोधन केलं आणि आदिवासी संस्कृतीचा अभिमान निर्माण केला. त्यांनी हा मुद्दा कायम पुढे नेला की, "आपली संस्कृती टिकवली, तरच आपलं अस्तित्व टिकेल."

त्यांच्या नेतृत्वाखाली याहा कणसरा महोउत्सव, पूजन सोहळे विविध आदिवासी आंदोलने झालीत, या कार्यक्रमांमधून त्यांनी सामाजिक प्रश्न, शिक्षण, आरोग्य आणि महिलांचा सन्मान यावरही भर दिला. त्यांच्या विचारांनी अनेक तरुण पुढे आले आणि त्यांनीही या अभियानात सहभाग घेतला.

संघटनेतून शक्ती मिळवलेला लढवैय्या समाजसेवक -

किसन ठाकरे हे "आदिवासी बचाव अभियान" या संघटनेचे सरचिटणीस आहेत या माध्यमातून त्यांनी याहा मोगी मातेच्या कार्याला एक संघटित स्वरूप दिलं. त्यांनी आपल्या विचारसरणीतून स्पष्ट सांगितलं की:

"आदिवासी देवता, आपली संस्कृती आणि आपली भाषा – हे जर

आपण विसरलो, तर आपण जगण्यातली ओळख हरवून बसू."
त्यांनी नेहमी गावातील थोरामोठ्यांना, तरुणांना आणि महिलांना एकत्र करून, त्यांच्या हक्कांसाठी लढा उभारला. याहा मोगी मातेच्या माध्यमातून त्यांनी जनतेच्या हृदयात आत्मभान जागवले.

६. आदिवासी संस्कृती संवर्धक – गणेश आहेर व मोतीलाल चव्हाण

आदिवासी संस्कृती ही निसर्गाशी घट्ट जोडलेली, साधेपणात माणुसकी जपणारी अशी आहे. मात्र आधुनिकतेच्या लाटेत व अनेक अंधश्रद्धांच्या प्रभावात मूळ परंपरा हरवत चालली होती. पण गावोगाव आजही असे काही कार्यकर्ते आहेत जे आपली माती, आपली परंपरा, आपला वारसा टिकवण्यासाठी लढत आहेत. या अग्रणी व्यक्तींपैकीच एक नाव म्हणजे – गणेश आहेर.

गणेश आहेर व मोतीलाल चव्हाण यांनी आपल्या जीवनातून समाजाला खरी दिशा दिली. मोतीलाल चव्हाण यांनी आपल्या घराची पूजा आदिवासी पद्धतीने करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे तसेच आहेर यांनी सर्वप्रथम आपल्या भावाचे लग्न आदिवासी पद्धतीने करून समाजात आदर्श निर्माण केला. आज जेव्हा अनेक जण आधुनिक पद्धतीकडे धावत आहेत, तेव्हा आहेर व चव्हाण यांनी “आपली परंपरा हीच खरी ओळख आहे” हे दाखवून दिले.

गावात रूढ झालेल्या काल्पनिक देव-धर्मप्रथा त्यांनी नष्ट केल्या आणि लोकांना मूळ आदिवासी संस्कृतीकडे परत नेले. यामुळे गावकऱ्यांमध्ये नव्या उर्जेचा संचार झाला.

विशेष म्हणजे, गणेश आहेर यांच्या पुढाकाराने दोन-तीन वर्षांपासून गावात नवरात्रामध्ये देव कणसरा उत्सव सुरू झाला. निसर्गदैवत पूजनासोबत पारंपरिक वाद्यांच्या गजरात, नृत्य-गायनातून, लोककला सादरीकरणातून गावात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामुळे तरुण पिढीला आपल्या परंपरेशी जवळीक निर्माण झाली आहे.

गणेश आहेर व मोतीलाल चव्हाण यांचे कार्य केवळ एक धार्मिक सोहळा जपण्यापुरते मर्यादित नाही, तर ते समाजाच्या आत्मसन्मानाचे पुनरुज्जीवन आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे गावात आज आदिवासी वारसा जोपासला जात आहे.

गावकरी अभिमानाने सांगतात –
“गणेश आहेर नसते तर आज आपण आपल्या संस्कृतीपासून दूर गेलो असतो. पण त्यांच्या प्रयत्नामुळे आपली खरी ओळख आजही जिवंत आहे.”

७. दृढ संकल्पातून साकारलेले स्वप्न

याहा मोगी माता ठाणाची निर्मिती ही केवळ एक धार्मिक घटना नव्हे, तर एक सांस्कृतिक आणि सामाजिक चळवळ ठरली आहे. या पवित्र कार्यामागे माजी महापौर रंजनताई भानसी, अरुणजी पवार माजी गटनेता तथा नगरसेवक नाशिक, पूजारा दत्तू साबळे आणि आदिवासी समाजाचे ज्वलंत नेतृत्व करणारे राहुल गावित, गणेश

आहेर, अतुल भानसी, मोतीलाल चव्हाण, किरण महाले, मनोज पवार, पांडुरंग गायकवाड, युवराज महाले, आदी यांचे अथक प्रयत्न हे सर्वात मोठे योगदान ठरले. पुजारा दत्तू साबळे यांनी धार्मिक निष्ठेने आणि भक्तीभावाने याहा मोगी मातेचे पूजन, आराधना, परंपरा यांचा जागर केला. त्यांनी गावागावात फिरून मातेची महती सांगितली, श्रद्धा जागवली आणि लोकांना एकत्र आणले. दुसरीकडे, राहुल गावित, गणेश आहेर व मोतीलाल चव्हाण यांनी या श्रद्धेचा सामाजिक आणि सांस्कृतिक रूपांतरण घडवून आणण्यासाठी नेतृत्व केले. आदिवासी समाजाच्या अस्मितेचे प्रतीक म्हणून या ठाणाची स्थापना करणे, ही केवळ धार्मिक नव्हे तर एक ऐतिहासिक पावती होती. या चौघांच्या नेतृत्वामुळे याहा मोगी मातेचे ठाण आज उभे आहे – श्रद्धेचा किल्ला, संस्कृतीचा दीपस्तंभ आणि समाजाच्या एकतेचे प्रतीक..

८. याहा मोगी मातेची जागा निश्चिती

याहा मोगी मातेच्या ठाणासाठी योग्य जागेचा शोध हा एक अत्यंत श्रद्धेचा आणि भक्तीचा प्रवास होता. समाजातील अनेक जाणते, वयोवृद्ध आणि अभ्यासू लोकांनी एकत्र येऊन चिंतन, चर्चेनंतर बोरगड – म्हसरूळ परिसराची निवड केली. ही जागा केवळ भौगोलिकदृष्ट्या मध्यवर्ती नव्हती, तर तिच्यात एक विशेष निसर्ग शक्ती ऊर्जा जाणवायची. आसपास निसर्गाचा शुद्ध श्वास, शांत वातावरण, आणि मातेची आधीपासूनच असलेली अज्ञात अनुभूती – या सर्व गोष्टींनी ठिकाण निश्चित केल्यावर संपूर्ण समाजात उत्साह संचारला. तिथे उभं राहिलेलं ठाण हे फक्त दगडांचा गाभारा नाही, तर

भावनेचं ठिकाण ठरत गेलं. प्रत्येक जण त्या मोकळ्या माळावर मातेचं रूप पहात होता. जागेच्या निश्चितीपूर्वी मातेला नारळ फोडणे, आणि पारंपरिक विधी करण्यात आले. हा निर्णय कोणत्याही एकट्या व्यक्तीचा नव्हता - तो संपूर्ण समाजाच्या मनाचा आणि श्रद्धेचा एकत्रित संकल्प होता.

"त्या जागेचा आवाज"

एक माळ होती निसर्गाच्या कुशीत,
शांत, निरव, पण भक्तांच्या हृदयींच्या गुशीत।
त्या मातेसाठी जागा शोधताना,
तीच हाक आली मातीच्या सुवासात झुलताना।
नारळ फुटला, दगड हलले,
मनामनात श्रद्धेचे भाव दाटले।
त्या जागेवर उभा राहील ठाण पवित्र,
जिथे आईचं असणार अखंड वास्तव्य नित्य।

- समाजातील भावभावना -

या क्षणी अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते — वर्षानुवर्षे जपलेलं स्वप्न मूर्त स्वरूपात साकार झालं होतं.
प्रत्येकाने तिच्यात आपली माता पाहिली, रक्षणकर्ती, अन्नदात्री, संकटमुक्त करणारी माता म्हणून.

"प्रतीकात्मक रूपात माता उतरली"

शिल्पात जिवंत स्पर्श होता, नजरांमध्ये वात्सल्य झळकत होतं,
याहामोगी मातेचं रूप पाहता, भक्तांचं हृदय साश्रू नमत होतं।
फुलांनी सजवलेले बैलगाडी ओढताना, भक्तीची झुंबर झळकत होती,
 सारे म्हणत होते "आई आली", आणि आभाळही गगनगर्जनेने नमत होती।

पावरीच्या सुरात मूर्त ठाणात विराजली,
नमन स्पंदनात भक्तीची नदी वाहत गेली।
शिला नव्हे ती, ती साक्षात माता होती,
याहा मोगी माता, आमच्या जीवाचं तेज, आशेची दिवटी होती।

९. पूजन सोहळा

भव्य मिरवणुकीचा सोहळा हजारोच्या लोकसंख्येने कणसरा नगर, पेठे रोड येथून प्रारंभ झाला. लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत सगळेच मातेच्या स्वागतासाठी सज्ज झाले होते.
मूर्त ठाणात आणल्यावर 'श्रीफळ फोडून', 'मातेच्या ओवाळण्या' करण्यात आल्या.. रात्रभर ढाक वाजून निसर्गदेव, पूर्वज, याहा मोगी माता यांची आळवनी कारण्यात आली..
याहा मोगी मातेच्या पूजनाचा सोहळा हा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नव्हता, तर संपूर्ण आदिवासी समाजाच्या अस्मितेचा आणि ऐक्याचा भव्य उत्सव होता. हा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला -श्रद्धा, एकजूट आणि अभिमानाचा.
दिवस होता ५ व ६ एप्रिल २०२५ चा या दिवशी ठाण परिसरात रंगरंगोटी, तोरण, फुलांची सजावट आणि पारंपरिक वेशभूषेतील

लोकांचा उत्साह यामुळे वातावरणात एक आदिवासी सांस्कृतिक झंकार होती.

याहा मोगी माता स्थापना सोहळा व सभामंडप लोकार्पण सोहळ्यासाठी प्रमुख मान्यवराची उपस्थिती :-

मा. नरहरी झिरवाळ साहेब (मंत्री अन्न औषध प्रशासन)
मा. राहुलजी ढिकले (आमदार,नाशिक मतदार संघ)
मा. चंद्रकांत खांडवी साहेब (उपायुक्त, नाशिक मनपा)
मा. रंजनाताई भानसी (माजी महापौर तथा नगरसेविका मनपा नाशिक)
मा. अरुणजी पवार (माजी नगरसेवक नाशिक)
मा. जयवंत गारे (अध्यक्ष - कोकणा / कोकणी आदिवासी समाज सेवा संघ, नाशिक
मा. किसन ठाकरे (सरचिटणीस - महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान)
मा. राम रावण चौरे (कोकणा /कोकणी/ कुकणा जमात केंद्रीय कार्यकारणी सदस्य)
मा. लकी भाऊ जाधव (अ. भा. आ. वि. परिषद)
मा. डॉ. कृष्णा गावित(नंदुरबार धुळे रहिवाशी संघ)
मा. ऍड दत्तू पाडवी (आदिवासी बचाव अभियान)
मा. नामदेव बागुल (माजी अध्यक्ष- कोकणा कोकणी आदिवासी समाज सेवा संघ)
मा. कवी रमेश भोये (आदिवासी बचाव अभियान)
मा. दुर्वा गायकवाड (कणसरा माता मित्र मंडळ)

मा. धर्मेंद्र बागुल (आदिवासी शिक्षक संघटना)
मा. कैलास अर्जुन (आदिवासी कोळी महादेव स. वि. सं)
मा. रविंद्र वळवी (ग्रामसेवक वि.आधि संघटना)
मा. घनश्याम सातपुते (ग्रामसेवक वि.धि संघटना)
मा. एन. डी. गावित (महामंत्री आ. आ. मोर्चा)
मा. विजय राऊत (माजी सरपंच निगडोळ)
मा. गणेश गवळी (अ.भा.आ.वि.परिषद)
मा. शिवाजी बर्डे (आदिवासी भिल्ल स. फाउंडेशन)
मा. राजाभाऊ वाघले (हर हर महादेव फाउंडेशन)
मा. मोतीराम पवार (आदिवासी शिक्षक संघटना)
मा. यशवंत पवार (अ. शि.प्रतिष्ठान नंदुरबार)
मा. चेतन खंबाईत (युवा संकल्प अभियान)

विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थिती :-

एँड टी. के. बागुल (से.नि.सनदी अधिकारी), प्रदीप भोये, नारायण साबळे, आनंदराव गायकवाड, डॉक्टर रघुनाथ भोये, दिलीप राऊत चिंतामण दादा गावित, के के गांगुर्डे, भास्कर शेठ गावित, हिरामण झिरवाळ, आनंदराव चौधरी, यशवंत गवळी, निलेश गवळी, सुधाकर राऊत, डॉक्टर हेमंत साबळे, डॉक्टर बोरसे, डॉक्टर गायकवाड, हरीश गांगुर्डे, जे. टी. सूर्यवंशी, डॉक्टर साहेबराव झिरवाळ, चिंतामण गायकवाड, मुन्ना तडवी, अमृत पालवी, सुभाष भुसारे, एकनाथ भोये, डॉक्टर जयराम कोठारी, विजय गावित, कृष्णा गावित, विजय पवार, शांताराम पवार, पि. के.महाले, हिरामण बहिरम, डी.पी. भरसट, योगेश गावित, शंकराव वाघ,

निवृत्ती आवारी, जयवंत ठाकरे, हिरामण बहिरम, देवा वाटाणे प्रभाकर फासळे, प्रभाकर गावित, विकी मुंजे, यशवंत पारधी, पृथ्वीराज अंडे, दीपक गवळी, नितीन थवील, नरेंद्र गायकवाड, दुर्गेश पालवी, विद्याधर गवळी, बाळासाहेब जाधव, सोनू गायकवाड, मयूर बागुल, शांताराम राऊत, नारायण कनोज, राजाराम इंफाळ, किशोर गवळी, बी एम गायकवाड, भास्कर पवार, काशिनाथ बागुल, नितीन महाजन,मनीष भोई, राहुल राऊत, हर्षंद्र भोई, मधुकर आवारी, शिवाजी ठाकरे, सोमनाथ भानसी, नामदेव ठाकरे, कृष्णा महाले, भाऊसिंग जाधव, द्वारकानाथ गवळी, संदीप तरवारे, हरीश भोई, भास्कर झिरवाळ, मनोज भोये, रमेश साबळे, माहरूकाका देशमुख, पांडुरंग पवार, भागवत धूम, विलास राठोड, गणेश पवार, बाळा पाडवी, शिरीष कुमार पाडवी, पोपटराव जोपळे, प्रवीण वळवी, पांडुरंग महाले, वंसत राऊत, राकेश दळवी, गितेश्वर खोटरे, सी.एल. पवार, भालचंद्र बहीरम, त्रंबक बळीरम, सुभाष गवळी, सुभाष पवार, हिरामण भोये, पंढरीनाथ चव्हाण, शरद जोपले, विजय खंबाईत, श्याम भडांगे, संदीप पवार, किसन बागुल, कृष्णा केंगा, सागर पवार, गणेश लहरे, बाळू पवार, शशिकांत पवार, गुलाब ठाकरे, गणेश आहेर, ज्ञानेश्वर बागुल, विशाल माळेकर, गणेश नाठे, युवराज महाले, पी.एम गायकवाड, विठ्ठल बागुल, ईश्वर ठाकरे, तुकाराम बळीराम, मांगीलाल गांगुर्डे, मधुकर खंबाईत, सुभाष कोल्हे, योगेश नाठे, नंदराज भडांगे, वसंत गवंदे, महेश गवळी, किशोर चौधरी, हिरामण गायकवाड, तुकाराम चौधरी, सुरेश तांदळे, रवी गायकवाड, रवी पवार, अमोल गावित, संदीप जगताप, हिरामण जाधव, राकेश गांगुर्डे, ललित गावित, अशोक पवार, पांडुरंग सापाटे, पिके भोये, राजाराम बागुल, पुंडलिक चौधरी, विठ्ठल मौळे, दिलीप चव्हाण,

अशोक खंबाईत, राजाराम इम्फाळ इपाळ, शंकरराव जाधव, अंबादास पालवी, विजय भरसट, देवराम गावित, काशिनाथ गायकवाड, लक्ष्मण बहिरम, वाघेरे सर, जितेंद्र बागुल, हर्षल भोये, सोमनाथ भोये, युवराज ठाकरे, चेतन चौधरी, बबलू सपाटे, गौतम पवार,अण्णा साबळे,आदित्य पवार, ऍड गोरख चौधरी

भारतीताई भोई, डॉ. रूपाली गांगुर्डे, डॉ. नंदा ठाकरे, सुनिता साबळे, पूनम आहेर, सुनंदा देशमुख, लतिका पवार, गौतम जगताप, यमुना थवील,पुष्पा जाधव, कुसुम खेताडे, अरुणा बागुल, जयश्री गावित, सरला गांगुर्डे, सुरेखा ठाकरे, उषा जाधव, प्रभावती गवळी, सीताबाई पवार, रोहिणी भुसारे, हेमलता चौधरी, सुनंदा वाघ, प्रतिभा बागुल, प्रभावती भोये, सिताबाई पवार, रोहिणी भुसारे, हेमलता चौधरी, दुर्गाबाई झिरवाळ, अनुसया वाघ, वैजयंती भोई, जिजाबाई भोई, उज्वला मोरे, देविका खंबाईत, मनीषा कांबळे, डॉक्टर प्रतिभा चौरे, चंद्रकला बहिरम, चंद्रभागा केंगा, तारा राऊत, इंदुमती राऊत, लताबाई चौधरी, आशा चौरे, वासुंदे सूर्यवंशी, अनिता बागुल, सुनिता गवळी, अक्काबाई बागुल,बेबीबाई बागुल,सुवर्णा जोपळे, पंकजा पवार, कल्पना भोये, मनीषा भोये, योगिता जाधव, सरोजताई भोये, रुक्मिणी गवळी,सरलाताई ठाकरे, सपना धूम, पार्वतीबाई दळवी कल्पना पवार..

मोलाचे सहकार्य :-

मा. गणेश भाऊ गिते (माजी स्थायी समिती सभापती मनपा नाशिक)
लक्ष्मण पिंटू गावडे, (बिल्डर)

मारू शेठ (बिल्डर)
अशोक जाधव
प्रकाश पटेल
सचिन पवार
राहुल पवार
अमित घुगे
ओमराज पाटील
भाऊराव पाडवी (शिल्पकार)
राजेंद्र कवर (शिल्पकार)
सुरेश कुटे (शिल्पकार)
कामिडी दादा (शिल्पकार)
गणेश गांगुर्डे (शिल्पकार), पालवी दादा (शिल्पकार)
महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान, कणसरा माता चौक मित्र मंडळ, देव कणसरा मित्र मंडळ वरद नगर बोरगड, कणसरा माता मित्र मंडळ, आदिवासी सेवक कचरूभाऊ राऊत अभ्यासिका बोरगड- म्हसरूळ,नाशिक, भगवती प्रतिष्ठान, कणसरा नगर (इंद्रप्रस्थ), रेणुका मित्र मंडळ, श्रीरामनगर मित्र मंडळ, केतकी नगर, कणसरा माता चौक व सर्व समाज बांधव

विधी व पूजन :-

भोपा माऊली, मुधानी, भगत यांनी कळसारोहण, ध्वजारोहण आणि आळवनी केली.

"याहा मोगी मातेची जय" घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला.

सांस्कृतिक कार्यक्रम :-

उद्घाटनानंतर विविध कार्यक्रमांचे आयोजन झाले:

आदिवासी लोकनृत्य (पावरी, तारफा, संबळ)

पारंपरिक वाद्यवृंद,

विद्यार्थ्यांची कविता व आदिवासी नृत्य सादरीकरण,

स्थानिक महिलांचे आदिवासी गाणं आणि नृत्य.

- समाजाचा अभिप्राय -

या दिवशी अनेक जेष्ठ व्यक्तींनी भाषणातून भावना व्यक्त केल्या:
“हे ठाण म्हणजे केवळ मातेचे चे स्थळ नाही, तर आपली संस्कृती आणि ओळखीचं ठाण आहे.”
“याहा मोगी मातेने आपल्याला एकत्र आणलं; इथून पुढे आपला मार्गही तिच्या आशीर्वादाने उजळणार आहे.”

संपूर्ण नाशिक शहर आनंदात न्हालं, सगळीकडे केवळ "आईचं नाव,

याहा मोगी मातेचा जयजयकार

"उद्घाटनाचा तो दिवस"

पावरीच्या सुरात भरलं आभाळ, फुलांनी सजली गाभाऱ्याची वाट,
मातेच्या ओवाळणीत सामील झाला भक्तांचा प्रत्येक हात।

ध्वज फडकला श्रद्धेचा, तरपा निनादला माळावर,
याहा मोगी मातेच्या जयघोषाने भरलं गावभर।

तेव्हा आभाळही खाली झुकलं, देवतेला सलाम घालायला,
समाजाचं एकतेचं दर्शन होतं, नवसंस्कृती फुलायला।

हा केवळ समारंभ नव्हता, ही होती परंपरेची नवसाजणी,
याहा मोगी आईच्या ठाणात उमलली नवी पहाट सजणी।

१०. सभामंडपाच्या विकासासाठी माननीय नामदार राहुल भाऊ ढिकले यांचे योगदान

समाजाच्या विकासासाठी राजकारण हे फक्त सत्तेचे साधन न ठेवता, ते एक सेवा धर्म म्हणून स्वीकारणारे नेते फारच थोडे असतात. त्यामध्येच एक झळाळता चेहरा म्हणजे माननीय आमदार राहुल भाऊ ढिकले. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि ग्रामीण विकासाच्या प्रत्येक पातळीवर आपल्या कार्यक्षमतेचा ठसा उमठवणाऱ्या राहुल भाऊंनी आपल्या आमदार निधीतून सभामंडप उभारण्यासाठी मंजुरी देऊन खऱ्या अर्थाने जनतेच्या हृदयात स्थान

निर्माण केलं आहे.

समाजाच्या गरजा ओळखून निर्णय :-

ग्रामीण भागातील किंवा शहरांच्या उपनगरांतील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यातच सांस्कृतिक कार्यक्रम, समाजिक स्नेहसंमेलने, महिला मेळावे, शासकीय योजनांचे जाहीर कार्यक्रम अशा अनेक उपक्रमांसाठी एक विविध कार्यक्षमतेचा सभामंडप असणे ही काळाची गरज बनली आहे. ही गरज ओळखून राहुल भाऊंनी आपल्या आमदार निधीतून या मंडपासाठी निधी मंजूर करून दिला.

स्वतः पुढाकार घेऊन प्रयत्नांची पराकाष्ठा :-
सामान्यतः निधी मंजुरीसाठी विविध स्तरांवर प्रयत्न करावे लागतात. मात्र, या मंडपाच्या संदर्भात राहुल भाऊंनी स्वतः पुढाकार घेऊन प्रशासनाशी सतत संवाद साधत, तांत्रिक बाबी पूर्ण करून लवकरात लवकर मंडपासाठी निधी उपलब्ध करून दिला. निधी मंजुरीनंतरही त्यांनी कामाची गती कमी होऊ दिली नाही. वेळोवेळी कामाचा आढावा घेत, दर्जात्मक व वेगवान कामासाठी संबंधित विभागांना स्पष्ट सूचना दिल्या.
केवळ रचना नव्हे, तर सामाजिक परिवर्तन :-
सभामंडप म्हणजे केवळ एक भिंतींची रचना नव्हे, तर तो ठरतो सामाजिक परिवर्तनाचे एक महत्त्वाचे केंद्र. याठिकाणी बालकांसाठी सांस्कृतिक शिबिरे, युवकांसाठी करिअर मार्गदर्शन, महिलांसाठी उद्यम विकास कार्यशाळा, तसेच वृद्धांसाठी संवाद सत्रे आयोजित

होणार आहेत. यामुळे समाजात एकात्मता, बंधुता आणि सकारात्मक जाणीव निर्माण होईल.

जनतेचा मन:पूर्वक आभार -

या सभामंडपामुळे समाजातील अनेक उपक्रमांना नवे बळ, नवे दिशा मिळणार आहे. ग्रामस्थांपासून ते स्थानिक नेतृत्वापर्यंत सर्वच स्तरावरून राहुल भाऊंच्या या पुढाकाराचे मन:पूर्वक कौतुक करण्यात येत आहे. अशा विधायक कामांमुळे ते 'जनतेचे आमदार' म्हणून ओळखले जात आहेत.

उपसंहार -

आज आपण जी विकासाची पावले टाकतो आहोत ती केवळ भौतिक रचनांमध्ये मर्यादित नाहीत, तर त्या आपल्याला सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने घेऊन जातात. सभामंडप ही एक अशीच रचना आहे जिथे समाजाचे विचार, संस्कृती, सर्जनशीलता फुलणार आहेत. आणि या सर्वांची मुहूर्तमेढ रोवणारे नाव म्हणजे माननीय आमदार राहुल भाऊ ढिकले.
त्यांच्या या योगदानासाठी संपूर्ण समाजकडून त्यांचे अभिनंदन आणि आभार!

११. सामाजिक योगदान व पुढील वाटचाल

याहा मोगी मातेचं ठाण उभारून फक्त धार्मिक स्थळ निर्माण झालं नाही, तर समाजात एकतेचा, विकासाचा आणि सेवाभावाचा एक नवा अध्याय सुरू झाला. हे ठाण म्हणजे भक्तीचं केंद्र आहेच, पण त्याचबरोबर सामाजिक जागृतीचं आणि सांस्कृतिक उन्नतीचं एक प्रेरणास्थान ठरत आहे.

१. सामाजिक उपक्रम :-

याहा मोगी माता ठाण समिती आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत:
आरोग्य तपासणी शिबिर – महिलांसाठी व वृद्धांसाठी मोफत आरोग्य तपासणी.
शैक्षणिक मदत – गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तकं, युनिफॉर्म वाटप.

वृक्षारोपण मोहिम – ठाण परिसरात आणि गावात हिरवाई टिकवण्यासाठी वृक्षारोपण.

महिला बचतगटांचे प्रशिक्षण – महिलांना अर्थसहाय्य व स्वावलंबनासाठी प्रशिक्षण शिबिरं.

आदिवासी कला व संस्कृतीचे संवर्धन - पारंपरिक नृत्य, गीत, हस्तकला यांना आदिवासी मंच.

२. भविष्यातील दिशा :-

ठाणाच्या माध्यमातून पुढील अनेक योजनांचा संकल्प करण्यात आला आहे:
कणसरा माता संस्कृती भवन – आदिवासी इतिहास, देवता, परंपरा साठवणारा संग्रहालय.
ग्रंथालय आणि अभ्यासिका – विद्यार्थ्यांसाठी ठाणाजवळ अभ्यासासाठी जागा.

आरोग्य केंद्र – प्राथमिक आरोग्य सुविधा देण्यासाठी स्वयंसेवी आरोग्य केंद्र.
युवकांसाठी रोजगार मार्गदर्शन – शासकीय योजना, प्रशिक्षण शिबिरांची माहिती.

३. समाजाचे विचार :-

ठाण हे केवळ पूजेचे केंद्र न राहता, सामाजिक प्रबोधनाचे केंद्र बनले आहे.
"कणसरा माता ही आमची आई आहे – ती केवळ रक्षणकर्ती नव्हे, तर प्रगतीची प्रेरक आहे," असे विचार आता तरुण पिढीत दृढ होत आहेत.
गावाने या ठाणामुळे आपली ओळख निर्माण केली असून, परंपरेची साखळी नव्या पिढीपर्यंत पोहोचू लागली आहे.

"आईचा आशीर्वाद, समाजाची वाटचाल"

याहा मोगी मातेच्या चरणी, उगमला विकासाचा किरण,
भक्तीच्या पलीकडे गेलं तिचं रूप – बनलं समाजाचं धन।

वृक्ष लावले, पुस्तकं वाटली, आरोग्याची दिली साथ,
आईच्या आशीर्वादाने चालतोय समाज विकासाच्या वाट।

नव्या पिढीत नवा उजेड, जुनी संस्कृती पुन्हा सजी,
आईचं ठाण – आता कर्म, शिक्षण आणि सेवेची पूजा बनली खरी।

१२. परिशिष्ट (Appendix)

१) फोटो गॅलरी :-

❇️ वर्ष २०१५ - २०२४ याहा कणसरा महोत्सवाचे प्रेरणादायी क्षणांचे दृष्यरूप."

❇️ वर्ष २०२३ - २०२४ देव कणसरा उत्सवाचे प्रेरणादायी क्षणांचे दृष्यरूप." ❇️

❇️ वर्ष २०२४ - भूमिपूजनाचे क्षणांचे दृष्यरूप." ❇️

❇️ वर्ष २०२५ - याहा मोगी माता स्थापना व सभामंडप लोकार्पण सोहळ्याचे क्षणांचे दृष्यरूप." ❇️

यहा - कणसरा महोत्सव २०२२

अभियान

यहा - कणसरा महोत्सव २०२२
देवासी बचाव अभियान

महोत्सव २०२२
अभियान
कणसरा माता

यहा - कणसरा महोत्सव २०२२



Shot on OnePlus
G.AHER .. | June 11, 2024 at 2:49 PM

Shot on OnePlus

याहामोगी कणमरा माता ठाण

Shot on OnePlus
By G.AHER . 2023.10.23 20:28

Shot on OnePlus
By G.AHER . 2023.10.24 17:21

देव कणसरा नगर, बोरगड, म्हसरुळ, नाशिक



Shot on OnePlus
By G.AHER 2023.10.23 18:52

Shot on OnePlus
By G.AHER .. 2023.10.24 17:21

Shot on OnePlus
By G.AHER .. 2023.10.23 20:27

२. आर्थिक सहयोगी -_मा. रंजनाताई भानसी (माजी महापौर तथा नगरसेविका नाशिक मनपा), मा.अरुणजी पवार गटनेता तथा नगरसेवक नाशिक मनपा, आदिवासी सेवक कचरूभाऊ राऊत अभ्यासिका बोरगड- म्हसरूळ नाशिक, महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान, कणसरा माता चौक मित्र मंडळ, देव कणसरा मंडळ बोरगड, महाराष्ट्र राज्य आदिवासी प्राथमिक शिक्षक संघटना मनपा नासिक, कणसरा नगर पेठ रोड टीम, नंदुरबार धुळे रहिवासी संघ, कणसरा मित्र मंडळ, डोंगरदेव कणसरा माता कला पथक कळवण , श्रीराम नगर टीम, बोरगड - म्हसरूळ परिसरातील ग्रामस्थ. तसेच समस्त आदिवासी समाज बांधव...

१३. माध्यम प्रसिद्धी

🌾 याहा मोगी माता ठाण 🌾

"मन:पूर्वक आभार"

याहा मोगी माता ठाण व सभामंडप लोकार्पण सोहळा, ५ व ६ एप्रिल २०२५

आदरणीय बंधु-भगिनींनो, जोहार!

याहा मोगी माता ठाण व सभामंडप लोकार्पण सोहळा, दिनांक ५ व ६ एप्रिल २०२५ रोजी पार पडलेला हा एक अद्वितीय, अभिमानास्पद आणि ऐतिहासिक क्षण ठरला. या दिवशी अनुभवलेल्या उत्साह, आस्थाभाव, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक गर्जनेस कोणत्याही शब्दांत बांधणे कठीण आहे. या यशस्वी सोहळ्याचे श्रेय केवळ एका संस्थेला किंवा व्यक्तीला नव्हे, तर आपणा सर्वांच्या

एकत्रित प्रयत्नांना, समर्पणाला, निष्ठेला आणि सेवाभावाला जाते.

या गौरवशाली क्षणानंतर, आम्ही “संस्कृती संवर्धक टिम – आदिवासी बचाव अभियान” आणि “ देव कणसरा मित्र मंडळ, बोरगड नाशिक” यांच्यावतीने, आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

१. आदिवासी सामाजिक संघटनांचे ऋण

प्रथम आणि सर्वात मोठा जोहार व आभार आमच्या सर्व आदिवासी सामाजिक संघटनांना. दूरदूरच्या गावांतून आलेल्या, सामाजिक व सांस्कृतिक ऐक्याचा प्रत्यय देणाऱ्या संघटनांनी आपली ओळख जपत सोहळ्यात बहुमोल योगदान दिलं. या एकोप्यामुळे हा कार्यक्रम एक आदिवासी अस्मितेचा जयघोष ठरला.

२. भोजन बनवणारी टीम – सेवा निस्वार्थी कर्तव्य

स्वयंपाक कक्ष हे त्या दोन दिवसांत “मातृत्वाचे घर” वाटले. तांदूळ, भाजी, भाकरी, वरण, मिठाई – प्रत्येक पदार्थात प्रेमाचा स्वाद होता. या सेवेच्या परंपरेला जपणाऱ्या सर्व माताभगिनी व तरुणांची आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत.

३. पावरी वादक, संबळवादक, ढाकवादक व वयोवृद्ध वयदार – सांस्कृतिक जागराचे प्राण

पारंपरिक वाद्यांच्या नादात व वयोवृद्ध वयदारांच्या पूजाविधीतून कार्यक्रमाची अध्यात्मिक उंची वाढली. त्यांनी परंपरांचा जागर केला. त्यांच्या आशीर्वादाने आणि निष्ठेने कार्यक्रम पावन झाला.

४. स्वयंभू कार्यकर्ते – न दिसणारे खरे नायक

वाहतूक, पाणी, स्वच्छता, पाहुण्यांचे स्वागत – कोणतीही कुरबूर न करता, सेवाभावाने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळे कार्यक्रम यशस्वी

झाला. त्यांचे हे योगदान अविस्मरणीय आहे.
५. महिलांचा सक्रीय सहभाग – सामाजिक नेतृत्वाचे प्रतीक
स्वागत, स्वयंपाक, पूजाविधी, सांस्कृतिक सादरीकरण अशा सर्व आघाड्यांवर महिलांनी जबाबदारीने नेतृत्व केले. त्यांचा सहभाग आपल्या समाजातील महिलांच्या सशक्ततेचे द्योतक ठरला.

६. सांस्कृतिक कार्यकर्ते व कलाकार – ओळख जपणारे दीपस्तंभ
नृत्य, वाद्य, गीतांमधून आपली परंपरा पुन्हा जिवंत झाली. या कलाकारांनी आपल्या संस्कृतीचा जयघोष केला. त्यांचा आदर आणि ऋण मान्य करून, पुढील पिढ्यांसाठी प्रेरणा दिली.
७. ग्रामस्थांचे योगदान – आयोजनाचा आत्मा
बोरगडसह वंजारी, करमाळे, शिवभाडणे, विरशेत येथील ग्रामस्थ, युवक-महिला मंडळांनी अतिशय आत्मीयतेने मदत केली. वीज, पाणी, स्वच्छता, पाहुणचार... प्रत्येक बाबतीत त्यांनी खारीचा वाटा उचलला.
८. मान्यवर अतिथी – सन्माननीय उपस्थिती प्रेरणादायी ठरली
या ऐतिहासिक सोहळ्यात राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नामदार नरहरी झिरवाळ पारंपरिक आदिवासी पोशाखात उपस्थित राहून आदिवासी समाजाच्या एकतेला बळ देत प्रेरणा ठरले. त्याचप्रमाणे नाशिक पूर्वचे आमदार मा. राहुल ढिकले, नाशिक शहर उपायुक्त मा. चंद्रकांत खांडवी व नगरसेवक मा. अरुणजी पवार यांची सन्माननीय उपस्थितीही मोलाची ठरली. त्यांचे शब्द, सानिध्य व सामाजिक जाणिवा आपल्या समाजासाठी बळकटीकरण करणाऱ्या ठरल्या. या कार्यक्रमाने पुन्हा एकदा दाखवून दिलं की, जेव्हा समाज एकत्र येतो, तेव्हा पर्वतरांगा सुद्धा हलतात.

कणसरा माता, ही केवळ एक दैवत नसून, ती आपल्या अस्मितेची, परंपरेची आणि एकतेची साक्ष आहे. तिच्या चरणी नतमस्तक होत, कार्यक्रमात थेट किंवा अप्रत्यक्षरित्या सहभाग घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीचे, संस्थेचे आणि बांधवांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

जय याहा मोगी माता!
जय आदिवासी!!
आप की जय!!
– “संस्कृती संवर्धक टिम, आदिवासी बचाव अभियान”

१४. समारोप

"श्रद्धा, संस्कृती आणि समाजाच्या एकतेचे प्रतीक म्हणजे कणसरा माता ठाण."
या प्रवासात एकही विटा कुणी विकत घेतली नाही – प्रत्येक विटा ही प्रेम, श्रद्धा आणि सेवाभाव यांनी तयार झाली होती.

आज हे ठाण केवळ धार्मिक स्थळ नाही, तर ही आहे एक प्रेरणा – समाज एकत्र आल्यास काय साध्य होऊ शकते याची जिवंत मूर्त पुढेही हे ठाण नवनवीन उपक्रमांसाठी उर्जास्त्रोत राहो, आणि याहा मोगी मातेचं आशिर्वाद अखंड लाभो हीच प्रार्थना.
"याहा मोगी मातेच्या चरणी"
घटिका सरल्या, इतिहास रचला,
श्रम आणि श्रद्धेने स्वप्नांना सचोटीने जुळवला।

याहा मोगी मातेच्या चरणी वाहिली प्रेमाची पालखी,
गाव, समाज, संस्कृतीची इथे सजली एकच साखळी।
ठाण उभारलं, पण बांधलं मनामनात ठाण,
आईच्या कृपेने उजळलं जीवन, केलं प्रत्येक क्षण सोनंसर।

ही कहाणी संपत नाही, ती रोज नव्यानं लिहिली जाते,
कारण माता नसते केवळ दगडात, ती असते आपल्याच
अंत:करणात।

१५. लेखक परिचय

आप राहुल वंदना कांतिलाल गावित
(लेखक, सामाजिक कार्यकर्ता आणि आदिवासी संस्कृती संवर्धक)

नाशिक जिल्ह्यातील एक संवेदनशील, अभ्यासू आणि समाजहितासाठी झटणारे व्यक्तिमत्व. आदिवासी परंपरा, संस्कृती आणि श्रद्धास्थान यांचं दस्तऐवजीकरण करून ते पुढील पिढीपर्यंत पोहोचावं, हा यांचा मुख्य हेतू आहे.
याहा मोगी मातेच्या ठाण उभारणीचा साक्षीदार आणि सक्रिय योगदानकर्ते म्हणून त्यांनी संपूर्ण घटनाक्रमाची लेखनशैलीतून जपणूक केली आहे.
त्यांनी या पुस्तकातून भक्ती, भावना, श्रम, परंपरा आणि एकता यांचे जिवंत चित्रण केले आहे.
"श्रद्धा शब्दांतून उमटावी, आणि संस्कृती पुढच्या पिढीला समजावी" — या हेतूने हा ग्रंथ साकारला गेला आहे.